**व्यवसाय / धंदा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...

गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल/व्हॉटस्‌अॅप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २९५ वा | मंगळवार, दि. ०८ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




# मराठी लोक कुणाची भाकर खाताहेत? भाजप खासदारानं ओकली गरळ

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** मीरा भाईंदर येथे व्यापाऱ्याला मनसेकडून मारहाण झाल्यानंतर आता हिंदी-मराठी वाद पेटला आहे, यात भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी खतपाणी घातलं आहे. त्यांनी केलेल्या विधानामुळे महाराष्ट्रात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

"तुम्ही कुणाची भाकरी खाताहेत, येथे टाटा, बिर्ला, अंबानी आहेत, तेच टॅक्स भरतात, मराठी लोक कुठला टॅक्स भरतात, आमच्या पैशावर तुम्ही जगत आहात, तुमच्यात हिंमत असेल तर महाराष्ट्राच्या बाहेर या, युपी, बिहार, तामिळनाडू मध्ये या, तिथं तुम्हाला आपटून आपटून मारु," अशी गरळ भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी ओकली. ते एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलत होते.

निशिकांत दुबे हे आपल्या वादग्रस्त विधानामुळे चर्चेत असतात. त्यामुळे त्यांनी भाजप पक्षश्रेष्ठींनी अडचणीत आहे. आता त्यांच्या या वक्तव्यावर पक्षश्रेष्ठींना त्यांना समज देणार का? असा प्रश्न विचारण्यात येत आहे. काल त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या विरोधात गरळ ओकली होती. आज त्यांनी केलेल्या संतापजनक विधानामुळे मराठी माणसामध्ये त्यांच्याविरोधात तीव्र भावना निर्माण झाल्या आहेत.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे फक्त उत्तर भारतीयांना मारहाण करीत आहेत. त्यांन तुम्हाला मारायचं असेल तर त्यांना मुंबईतील तामिळी, तेलुगु आणि उर्दू सगळ्या भाषिकांना मारुन दाखवावे. माहिममध्ये जाऊन हिंदी भाषिकांसोबत उर्दु भाषिकाला ठाकरे बंधूंनी मारुन दाखवले तर मी त्यांना बाळासाहेब ठाकरेंचा वारसदार असल्याचे मानेल, आम्ही मराठीचा सन्मान करतो पण ही हुकूमशाही खपवून घेणार नाही, असे दुबे यांनी सांगितले.

# बा विठ्ठला... बळीराजाला सुखी व समाधानी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर, सर्वांनाच सन्मार्गाने जगण्याची सुबुद्धी दे - मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी श्री कैलास दामु उगले, सौ. कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषतः या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धमार्ची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले. यामध्ये यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार वितरण**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक - श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक १३, जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा. द्वितीय क्रमांक - श्री बाळकृष्णबुवा वारकरी दिंडी क्रमांक १९, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा. तृतीय क्रमांक - श्री गुरु बाळासाहेब आजरेकर दिंडी क्रमांक २३, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा.

# जिल्हाधिकारी व सिईओ यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा कालावधीत सर्व संताच्या पालखी मार्गावर व पंढरपूर शहरात भाविकांसाठी खास सुविधा देऊन उत्कृष्ठ काम केले बद्दल जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते गौरव करणेत आला. दरम्यान पंढरपूर पंचायत समितीच्या प्रांगणात निर्मलदिंडी च्या समारोप समारंभात जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व सिईओ कुलदीप जंगम यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करणेत आला. सातारा व पुणे जिल्ह्याचा सन्मान पत्र विभागीय आयुक्त म्हणून डॉ. चंद्रकांत पुंडकुलवार यांचे कडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते सुपूर्द करणेत आले. या कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी ग्राम विकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे हे होते. यावेळी कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुंडकुलवार, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजित पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देंवेद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवाडे, उप सचिव डॉ. पदमश्री बायनाडे, सचिव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, विशेष कार्यकारी अधिकारी दादासाहेब कांबळे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, महिला बाल कल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकिले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव, प्रणव परिचारक, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, गट विकास अधिकारी सुशिल संसारे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज राऊत मान्यवर उपस्थित होते.

(पान 2 वर..)

**आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा पुढाकार अन पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सन्मान..!**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुख्यमंत्री यांना बोलून ग्रामविकास मंत्री व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मार्गदर्शना खाली प्रशासनातील अधिकारी यांनी चांगले काम केलेचे निदर्शनास आणून दिले नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत हून पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा वारकरी फेटा, उपरणे घालून सन्मान केला. पालकमंत्री गोरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद व सिईओ कुलदीप जंगम यांचा सन्मान करणेची विनंती मुख्यमंत्री यांचे कजे केली. पालकमंत्री गोरे यांनी हे काम सफाई कर्मचारी यांचे पासून विभागीय आयुक्त यांचे पर्यंत सर्वानी परिश्रम घेतले आहेत असे सांगून श्रेय सर्वांना देऊन टाकले.

# यंदाच्या आषाढी वारीने मोडले सर्व विक्रम

## AI च्या सहाय्याने केली मोजणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** विक्रमी होती याचा पुरावा आता थेट यावर्षी वापरलेल्या एआय तंत्रज्ञानाने दिला आहे. आषाढी एकादशी दिवशी सकाळी 6 ते रात्री 12 या कालावधीत तब्बल 27 ते 28 लाख भाविकांचा हेड काउंट नोंद झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली आहे.

यावर्षी आषाढी एकादशीला मुंगीलाही पाय ठेवायला जागा नव्हती. जिकडे पहावे तिकडे फक्त भाविकांचा महासागर लोटल्याचे चित्र होते. आजवरचे आषाढी वारीच्या गर्दीचे सर्व विक्रम मोडले आहेत.



यंदा पहिल्यांदाच वापरलेल्या एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडण्यात आलेल्या ड्रोनने या भाविकांची मोजणी केली आणि हा आकडा 27 ते 28 लाख इतका मिळून आला. प्रशासनाने एकाच वेळेला चंद्रभागेकडे येणारा मार्ग दर्शन रांग मंदिर परिसर अशा सहा विभागात ड्रोन सोडून ही माहिती संकलित केली आहे. आषाढी साठी पन्नास हजारापेक्षा जास्त ट्रक, टेम्पो, कार आणि विविध खाजगी वाहने नोंद झाली आहेत. याशिवाय जवळपास सहा हजार एसटी बसेस आणि 100 रेल्वे फेऱ्यातून प्रवासी आले होते.

**वाहतूक नियोजनासाठी देखील एआय तंत्रज्ञानाची मदत**

विशेष म्हणजे आज द्वादशीला सकाळच्या सहा तासात 95 टक्के वाहने आणि भाविक परतल्याने आता पंढरपूर मोकळे झाले आहे. वाहतूक नियोजनासाठी आज पहाटेपासून शहराबाहेर पडणाऱ्या सर्व सहा मार्गावर सहा डीवायएसपी दर्जाचे अधिकारी आणि पोलिसांचा फौज फाटा तैनात होते. त्यामुळं लाखो भाविकांना दुपारपर्यंत बाहेर जाताना कोठेही वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागले नाही.

(पान 2 वर..)


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)

B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )

२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**

विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in

94 22 23 90 13



**निरामय पॅरालिसिस सेंटर**

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर

निरामय पॅरालिसिस सेंटर

प्रत्येक जिल्ह्यात फ्रेंचाइज़ी देणे आहे

फ्रेंचाइजी का घ्यावी?

- No Royalty.
- कमीत कमी Operating Cost.
- तुलनेने सर्वाधीक नफा मिळेल.
- अनुभवी डॉक्टर
- अनुभवी स्टाफ
- कमीत कमी गुंतवणुक

फ्रेंचाइजी साठी आजच संपर्क करा

9503310568


# फडणवीस यांच्या स्वागताला काँग्रेसचे दिलीप माने यांची हजेरी

## राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतला हजेरी लावली आहे.

त्यांच्या या उपस्थितीमुळे सोलापूरच्या राजकीय वतुर्ळात चर्चेला उधाण आलं आहे. दिलीप मानेंनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह माजी आमदार दिलीप माने हे देखील मुखमंत्र्यांच्या भेटीला उपस्थित होते.



अलीकडेच झालेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार दिलीप मानेंनी निवडणूक लढवत विजय मिळवला होता. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे काल आषाढी एकादशी निमित्ताने कार्यक्रम आटपून परत निघताना सोलापूर विमानतळवर दिलीप माने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मात्र या भेटीमुळे राजकिय वर्तुळात

(पान 2 वर..)

संपादकीय

# कोंडीचा प्रयत्न

पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि बांगलादेशातील शेख हसीना यांच्या राजवटीचे पतन या भिन्न गोष्टी असल्या, तरी भारताच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आणि महत्त्वाच्या आहेत. आपण जगभर भ्रमण केले आणि भारताच्या आर्थिक प्रगतीचे आणि गुंतवणूकदारांना भारतात असलेल्या संधींचे कितीही ब्रँडींग केले तरी शेजारी आणि सीमेवर ज्या घटना घडत आहेत किंवा आकार घेऊ पाहत आहेत त्या दुर्लक्षित करता येत नाहीत. जो नफा कमावण्यासाठी भारतात गुंतवणूक करू इच्छितो त्या उद्योजकाला सगळीकडून शांतता आणि सुरक्षिततेची हमी हवी असते. रोज युद्धच होईल किंवा युद्धसदृश स्थिती आहे अशातला भाग नाही; तथापि, पाकिस्तान आणि बांगलादेश चीनकडून दिल्या जार्णाया प्रोत्साहनामुळे जे काही करत आहेत ते भारताला येर्णाया काळात तापदायक ठरणार आहे.

भारतविरोधी कारस्थानांच्या त्यांच्या मालिकेतील अलीकडची समोर येत असलेली ताजी घटना म्हणजे 'सार्क'सारखी संघटना स्थापन करण्याचा त्यांचा प्रयत्न. ही संघटना स्थापन होईल, भारताला त्यात सहभागी होण्याचे औपचारिक निमंत्रण दिलेही जाईल, मात्र 'सार्क'मध्ये भारताची जी भूमिका आणि स्थान होते ते या नव्या संघटनेत नसेल त्याचे कारण चीन. चीनच्या पुढाकारानेच जर संघटना आकाराला येत असेल, तर चीनचे हेतू भारताला दुय्यम स्थानावर ढकलण्याचेच आहेत व त्याकरता पाकिस्तानच्या माध्यमातून अन्य शेजारी देशांना तो भरीला घालतो आहे. चीन आणि पाकिस्तान यांच्यात याबाबतची चर्चा बरीच पुढे गेली आहे. खुद्द पाकिस्तानच्या माध्यमांनीच याला सविस्तर प्रसिद्धी दिली आहे. अलीकडेच म्हणजे 19 जूनला चीनच्या कुनमिंग येथे एक बैठक झाली होती. त्यात अंतरिम सरकार अस्तित्वात असलेल्या बांगलादेशलाही सहभागी करून घेण्यात आले होते. दक्षिण आशियातील जी राष्ट्रे 'सार्क'चे सदस्य राहिले आहेत त्यांना सहभागी करून घेणे हा या कुनमिंगमधील बैठकीचा उद्देश होता. मे महिन्यात अशीच एक बैठक अफगाणिस्तानला सहभागी करून घेत झाली होती. अफगाणमधील तालिबानी राजवटीशी संघर्ष सुरू असला, तरी त्यांच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून केला जातो आहे त्याचे कारण चीनचे या भागात गुंतलेले आर्थिक हितसंबंध. चीन पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर अर्थात सीपीईसीचा चीनला अफगाणिस्तापर्यंत विस्तार करायचा आहे. 'सार्क'ची स्थापना 8 डिसेंबर 1985 रोजी झाली होती. त्यात जे सात संस्थापक सदस्य राष्ट्र होते आणि नंतर सहभागी झालेला अफगाणिस्तान या सगळ्यांना आपल्या पट्ट्यात घेण्याचा चीनचा प्रयत्न आहे. 'सार्क'ची शेवटची बैठक 2014 मध्ये काठमांडूत झाली होती. नंतरची बैठक पाकिस्तानात होणार होती. उरी येथे दहशतवादी हल्ला झाला आणि भारताने त्या बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यानंतर एकही बैठक झालेली नाही. भारत आणि पाकिस्तानातील आजचे संबंध जगजाहीर आहेत. प्रचंड तणाव या दोन देशांत आहे आणि सर्व व्यवहार बंद आहेत. बांगलादेशातही मोहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार आल्यापासून भारताचे त्या देशाशी संबंध पूर्वी कधी नव्हते एवढे बिघडले आहेत. अन्य शेजारी देश असलेल्या श्रीलंकेशी सामान्यतः भारताचे चांगले संबंध राहिले आहेत. भारत या देशाला आर्थिक आणि अन्य सर्वच बाबतींत सहकार्य करत असतो. श्रीलंकेचे नवे राष्ट्रपतीही भारताशी मैत्रीपूर्ण संबंध कायम राहण्याच्याच बाजूने असल्याचे त्यांच्या भारत भेटीतून त्यांनी सूचित केले आहे. नेपाळ आणि भारताचे ऐतिहासिक संबंध आहेत. या दृढ संबंधांना धार्मिक-सांस्कृतिक किनारही आहे.

मात्र गेल्या दशकभरातील नेपाळमधील अस्थिर राजकीय परिस्थिती आणि चीनचा तेथेही वाढत चाललेला प्रभाव याची नेपाळ भारत संबंधांवरील छाया गडद होत चालली आहे. मालदीवसोबतच्या नात्यातही अलीकडच्या काळात बरेच चढ-उतार पाहायला मिळाले. चीनची येथेही गुंतवणूक आणि प्रभाव वाढतो आहे. यात केवळ भूतान हाच 'सार्क'मधील एकमेव देश भारतासोबत घट्ट राहिला आहे. थोड्याफार प्रमाणात आता श्रीलंकाही तसाच होऊ पाहत आहे. चीन आपले भू राजकीय हित साधण्याचा भाग म्हणून भारतापुढे याच देशांचा वापर करत अडचणी निर्माण करण्याचा अथवा भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करताना दिसतो. चीनचा दक्षिण आशियातील वाढत जाणारा प्रभाव भारतासमोर आव्हान आहेच, भविष्यात त्याची व्याप्ती अधिकच वाढत जाणार आहे.

पाकिस्तान आणि बांगलादेश व अफगाणिस्तानसोबत त्यांच्या झालेल्या बैठका या सामान्य घडामोडी नाहीत. 'सार्क'सारखी पयार्यी व्यवस्था उभी करण्यात आली आणि भारताला तेथे दुय्यम स्थानावरच समाधान मानावे लागणार असेल तर त्याचे अनेक तोटे असतील. विभागीय सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी भारताने 'बिमस्टेक' आणि 'इंडो पॅसिफिक'सारख्या मंचांच्या माध्यमातून जरी आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध दृढ करण्याचा प्रयत्न केला असला तरी पूर्वी जे स्थान भारताचे होते ते चीनच्या वाढत्या प्रभावामुळे आणि विभागातील सहभागामुळे आता राहणार नाही व भारतासाठी गोष्टी तेवढ्या सोप्याही नसतील. भारताचा प्रभाव कमी करणे आणि शक्य तेवढी कोंडी करणे अशी आखणी केली जाते आहे किंवा केली गेली आहे. अर्थात, भारताची अर्थव्यवस्था अन्य देशांच्या तुलनेत भक्कम आहे.

राजनैतिक स्तरावरही भारताने जगातील बहुतांश प्रमुख मंचांवर आपला प्रभाव पाडत पाकला गेल्या काही काळात एकाकी पाडले आहे. तथापि, रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-हमास आणि इस्रायल आणि इराण संघर्ष आणि अमेरिकेतील गोंधळेलेली राजवट आदी बाबी आणि त्यात युरोपीय देशांतही निर्माण झालेली संभ्रमाची स्थिती असे अगदी विचित्र वातावरण जगात आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या अगदी शेजारी काय होते आहे आणि होऊ पाहते आहे याची भारताला खास खबरदारी घ्यावी लागेल.

# किमान स्वतःच्या बापाचा तरी आदरयुक्त दरारा असावा!

एकेकाळी प्रत्येक घरात व प्रत्येक समाजात ज्येष्ठांचा आदरयुक्त दरारा होता. मुले आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा आदर करत होते. त्यांच्यापुढे जाऊन बोलायला घाबरत होते. त्यांच्या शब्दांचा मान ठेवत होते. त्यांनी दिलेल्या शब्दांचे तंतोतंत पालन करत होते. त्यांनी सांगितलेली कामे मुकाट्याने ऐकत होते. वडीलधाऱ्या माणसांसमोर वाईट वर्तन करायला त्यांची हिंमत होत नव्हती. त्यांच्यासमोर एखाद्याला वाईट बोलायचे म्हटले तर त्यांच्या तोंडातून शब्द निघत नव्हता. त्यांच्यापुढे मोठ्या आवाजात बोलायची सुद्धा कोणाची हिंमत होत नव्हती. नुसते बाहेर जरी फिरायला जायचे म्हटले तर अगोदर वडीलधाऱ्या माणसांना बघावे लागायचे, ते जर बाहेर दिसले तर त्यांच्या समोरून जायला भीती वाटायची. ते आपल्याला काय म्हणतील? आपल्याला काही बोलणार तर नाहीत ना? असे अनेक प्रश्न पडायचे. मित्रांमध्ये आपापसात चर्चा करायची म्हटली तर वडीलधाऱ्या माणसांपासून दूर जाऊन बोलावे लागायचे. त्यांच्यासमोर चांगले वर्तन व चांगले आचरण ठेवावे लागायचे. आपण जर त्यांच्यापुढे नकळतपणे वाईट वागलो, कोणाला चुकून बोललो, मानवतेला न शोभणारे वर्तन केलो तर वडीलधारी माणसे आपल्याला बोलावून घ्यायची आणि रागाने खडे बोल सुनवायची. तेव्हा आईवडील देखील आमच्या मुलांना का असे बोललात? म्हणून त्यांना विचारायला सुद्धा येत नव्हते. तेव्हा आपले कोण आणि परके कोण? याची जाणीव जराही होत नव्हती. तेव्हा सगळे समाजबांधव आपलेच आहेत असे वाटायचे. म्हणून समाजात वडीलधाऱ्या माणसांचा आदरयुक्त दरारा होता. तेव्हा वडीलधाऱ्या माणसांच्या शब्दांना किंमत होती. वडीलधारी माणसे जे सांगतील ते मुकाट्याने ऐकून तसे आचरण केले जायचे. त्यांच्या शब्दांना पायदळी तुडवले जात नव्हते. तेव्हा समाजातील वडीलधाऱ्या माणसांचा एवढा आदरयुक्त दरारा असेल तर घरातील आई-वडिलांचा व आजी-आजोबांचा किती आदरयुक्त दरारा असेल? हे आपल्याला विचार केल्यावर कळते. तेव्हा आई-वडिलांची मुलांना खूप भीती वाटायची. वडिलांच्या समोर जायला मुले घाबरायची. वडील बाहेर असले, तर मुलगा घरात राहायचा, आणि वडील घरात असले तर मुलगा बाहेर असायचा. म्हणजे वडिलांच्या समोर जायची कोणत्याच मुलाची हिंमत होत नव्हती. वडिलांना बोलायचे म्हटले तर अंग थरथर कापायचे. वडिलांना बोलायची हिंमत सहसा कोणताच मुलगा करत नव्हता. वडिलांच्या समोरून जायचे म्हटले तर मान खाली घालून मुकाट्याने जावे लागायचे. वडिलांनी सांगितलेली घरातील व शेतातील सगळी कामे मुकाट्याने करावी लागायची. नाही केले तर वडील कठोर शिक्षा द्यायचे. तेव्हा वडिलांनी नुसते डोळे जरी वटारून पाहिले तर मूले घाबरायची. त्यांना मारणे तर दूरच, पण शब्दांचा मारच त्यांना पुरेसा होता. कोणतीही गोष्ट करायची झाली तर मुलांना अगोदर वडिलांना विचारावे लागायचे. नाहीतर आपण वडिलांच्या माघारी एखादी गोष्ट केली, तर वडील काय बोलतील? या भीतीपोटी त्यांना वडिलांना सांगूनच पुढील पाऊल उचलावे लागायचे. तेव्हा मनाने कोणतीच गोष्ट करायची हिंमत कोणताच मुलगा करत नव्हता. वडिलांचा आदरयुक्त दरारा एवढा होता की, तेव्हा त्या मुलांना सुपारीच्या खांडाचे देखील व्यसन नव्हते, दारू, गांजा, तंबाखू व सिगारेट हे तर दूरच होते. पण साधी बडीशोप जरी खायची म्हटली तर मुले विचार करायचे. वडिलांसमोर वाईट बोलणे व एखाद्याचा अपमान करणे हे त्यांना जमायचे नाही. म्हणजे त्यावेळी घरोघरी सुसंस्कारी वातावरण होते. तेव्हाची मुले संस्काराच्या छायेखाली लहानाचे मोठे झाले होते. तेव्हा त्यांना संस्कार देणारे संस्काराचे प्रमुख व्यासपीठ आजी-आजोबा होते. त्यांच्या संस्काराच्या छत्रछायेखाली मुलांचा शारीरिक व मानसिक विकास होत होता. म्हणून मुले आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा आदरयुक्त दरारा ठेवत होते. पण आजकाल सगळे विपरीत होऊन बसले आहे. प्रत्येक घरातील मुलांवर संस्कार रुजवणारे आजी-आजोबा आता राहिले नाहीत. विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आल्यामुळे आजकालच्या मुलांना आजी-आजोबांचा तेवढा सहवास राहिला नाही. म्हणून मुले संस्कारहीन व चारित्र्यहीन निघाली आहेत. घरातील आई-वडिलांना व आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांना कवडीचीही किंमत देत नाहीत. घरातील आई-वडिलांची व बाहेरील वडीलधाऱ्या माणसांची असलेली आदरयुक्त भीती आताच्या मुलांमध्ये जराही राहिली नाही. वडिलांच्या शब्दांना पायदळी तुडवून मनाला वाट्टेल तसे वागत आहेत. रानटी पशुप्रमाणे वर्तन करून मानवतेला कलंकित करत आहेत. आई-वडिलांचा व गावातील वडीलधाऱ्या माणसांचा मानसन्मान ठेवायचा असतो हे विसरून गेले आहेत. त्यांना आई-वडिलांची जराही भीती वाटत नाही. आईवडील आपले पहिले गुरु व मार्गदर्शक असतात हे ते पूर्णपणे विसरून गेले आहेत. वडिलांच्या समोर कसे बोलावे, त्यांच्या समोरून कसे चालावे, याचे जराही भान आजकालच्या मुलांना राहिले नाही. वडिलांच्या समोर काही मुले जोरजोराने बोलतात. त्यांना आई-वडिलांची किंमत जराही राहिली नाही. तर समाजातील वडीलधाऱ्या माणसांना हे काय किंमत देणार? काही मुले व्यसन करायला बापाला सुद्धा घाबरत नाहीत. बापाच्या समोर गुटखा खाऊन पिचकारी मारतात. त्यांच्यासमोर सिगारेट ओढून धूर सोडतात. तेव्हा मुलांना कशाचीच लाज वाटत नाही. उलट बाप त्यांचे हे वर्तन बघून मनाला लाजतो आणि तिथून निघून जातो. काही मुले तर आई-वडिलांसमोर घरी आणून दारू पितात. मला दारू पिण्यासाठी पैसे द्या म्हणून मायबापाला भांडतात. आपण बापाला दारू पिण्यासाठी पैसे कसे मागावे? याची त्यांना जराही लाज वाटत नाही. जर त्यांनी दारू पिण्यासाठी पैसे नाही दिले तर बापाला घाण घाण शिव्या देतात आणि बापाला मारायला अंगावर जातात. ज्या घरात बापालाही व्यसन आहे आणि मुलालाही व्यसन आहे, त्या घरातील दोघेही बापलेक एकत्र बसून दारू पितात. म्हणजे बापही लाजत नाही आणि मुलगाही लाजत नाही. बापाने दारू पिली तर वेगळी गोष्ट आहे. पण मुलाने बापाच्या समोर बसून दारू पिणे हे वर्तन मानवतेला शोभणारे नाही. म्हणूनच आजकालच्या मुलांना कसलीच चव राहिली नाही. ज्यांना स्वतःच्या बापाची तीळमात्र भीती वाटत नाही, जो स्वतःच्या बापासमोर बसून दारू पितो, स्वतःच्या बापाला दारू पिण्यासाठी पैसे मागतो, त्यांना घाण घाण शिव्या देतो, पैसे नाही दिले तर त्यांना जीवे मारण्याची धमकी देतो, त्यांना घराच्या बाहेर जा म्हणून सांगतो, वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतो, आणि खुशाल मायबापापासून अलिप्त राहतो, अशी मुले मायबापाच्या पोटी जन्माला न आलेलीच बरी. मायबाप निपुत्रिक राहिले तरी चालतील. जी मुले स्वतःच्या मायबापाला घाबरत नाहीत, स्वतःच्या आजी-आजोबांना घाबरत नाहीत, जवळच्या नातेवाईकांना घाबरत नाहीत, स्वतःच्या भावाला घाबरत नाहीत, ती मुले समाजातील वडीलधाऱ्या माणसांना काय घाबरतील आणि त्यांची काय म्हणून आदरयुक्त भीती ठेवतील? हे विचार करायला लावणारे प्रश्न आहेत. हे फक्त संस्काराच्या अभावामुळे होत आहे. आजकालच्या मुलांना योग्य असे संस्कार मिळत नाहीत. पूर्वीसारखे शिक्षण आजकालच्या शाळेमध्ये मिळत नाही. शासनाने शिक्षकांना मुलांना मारायचा अधिकार दिला नाही. मग मुले कसे काय सुधारतील? एखाद्या शिक्षकाने मुलांना मारले तर मुलगा त्यांना शिव्या देतो, पुन्हा आईवडील येतात आणि आईवडीलही त्यांना शिव्या घालतात. विद्यार्थ्यांना शिक्षकांची आदरयुक्त भीती नसेल तर विद्यार्थी कसे काय घडतील? मुलांना जीवनात यशस्वी व्हायचे असेल आणि सुसंस्कारी म्हणून नाव कमवायचे असेल तर मुलांनी आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा आदरयुक्त दरारा ठेवला पाहिजे. त्यांच्या आज्ञांचे पालन केले पाहिजे. ज्या मुलांनी आई-वडिलांच्या आज्ञांचे पालन केले नाही, त्यांच्या शब्दांना किंमत दिली नाही, त्यांना रोज शिव्या घातल्या, त्यांना घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला, त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या त्या मुलांच्या जीवनात दुःखाचा व अपयशाचा काळोख पसरतो..त्या मुलांच्या वाट्याला कधीच यश येत नाही... त्यांच्या जीवनात दुःखच दुःख पसरत असते...ते स्वतःच्या हाताने स्वतःचा विनाश करून घेतात... स्वतःच्या हाताने पायावर धोंडा मारून घेतात...म्हणून मित्रहो जीवनात यशस्वी व्हायचे असेल, जीवनात खूप मोठ्या उंचीवर जायचे असेल, आनंदाने, सुखाने व समाधानाने राहायचे असेल आणि जीवनात एक चांगला, सभ्य व चारित्र्यवान माणूस म्हणून ओळख निर्माण करायची असेल तर आपल्याला आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांची किंमत करावी लागेल. त्यांच्या आज्ञांचे पालन करून तसे आचरण करावे लागेल. व्यसनापासून कोसो दूर राहावे लागेल, स्वतःच्या आई-वडिलांना म्हातारपणात त्यांची काठी होऊन त्यांना आधार द्यावा लागेल, ज्यांनी स्वतःच्या आई-वडिलांचा आदरयुक्त दरारा ठेवला, आई-वडिलांना म्हातारपणात खूप जीव लावला, त्यांची जीवापाड काळजी घेतली, त्यांचा वेळेवर दवाखाना केला, त्यांना वेळेवर जेवण दिले, त्या मुलांच्या जीवनात सुखाची समाधानाची, यशाची व आनंदाची मंगलमय पहाट उगवली आहे. ज्या मुलामध्ये आई-वडिलांबद्दल आदरयुक्त भीती असते, जो मुलगा आई-वडिलांचा सन्मान करतो, तोच मुलगा म्हातारपणात आई-वडिलांचा सांभाळ करतो. म्हणून प्रत्येक मुलाला कळकळीची नम्र विनंती आहे की, बाबांनो, तुम्हाला जर जीवनात एक चांगला माणूस म्हणून नाव कमवायचे असेल, सुखी व आनंदी राहायचे असेल, जीवनात यश मिळवायचे असेल, तर आपल्यापेक्षा वडीलधाऱ्या माणसांचा व आपल्या आई-वडिलांचा आदरयुक्त दरारा असला पाहिजे. एकवेळ कोणाबद्दल आदरयुक्त दरारा असो किंवा नसो पण किमान स्वतःच्या बापाचा तरी आदरयुक्त दरारा असलाच पाहिजे...तरच आपल्याला स्वतःला माणूस म्हणून घेण्याचा अधिकार आहे..

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर
जिल्हा लातूर, मो.7498715661

प्रबोधन

# रोज नवी उंची । गाठा कर्तृत्वाची

जग बदलेल, पण भारत मात्र कधीही बदलणार नाही. कुणीही असं छातीठोकपणे म्हणावं, अशीच आपल्या समाजाची स्थिती होती, आहे आणि असेल. उदाहरणार्थ, आमच्या दैववादी मनावर पूर्वी दैव जाणिले कुणी हे गीत अधिराज्य गाजवून गेलं. ते विस्मरणात जाण्यापूर्वी खेळ कुणाला दैवाचा कळला? हे नवं गीत जुन्या गीताची जागा पटकावून आम्हाला पसंतीदर्शक माना डोलवायला लावीत अवतीर्ण झालं. जगातील सुखदुःखं भाग्यजनित आहेत! हे मत्स्यपुराणातील हजारो वर्षांपूवीर्च विधान अजून आमची आणि आमच्या कविवर्यांची पाठ सोडायला तयार नाही, हे खेदजनक आहे. ह्या भाग्यवादाने भारतीयांची मानसिकताच कुजवून टाकली आहे. भारताच्या सर्वच राजकीय, सामाजिक, नैतिक, भौतिक समस्यांचं मूळ ह्या भाग्यवादातच सापडेल यात शंका नाही.

भारताचे सुपुत्र, विवेकानंद मात्र एक चिकित्सक विद्वान आणि स्वतःच्या बुद्धीने जगणारे, निर्भीडपणे आपले विचार जगापुढे मांडणारे महामानव होते म्हणूनच ते म्हणाले, 'दैव नावाची कोणतीही गोष्ट या जगात नाही,' दुदैवाने या बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंताचा मृत्यू अकाली झाला. अन्यथा हिंदूधर्मजन्य रूढी-परंपरा, आचार-विचारांची सनातनी कोळीष्टकं आपल्या नवप्रबोधनवादी विचारांनी त्यांनी झाडून काढली असती. विवेकानंदांपूर्वी चार्वाकांचा थोर समर्थक चाणक्य यानेही दैववाद खोडून काढताना तेजस्वी, ओजस्वी उद्गार काढलेत. दैव पुरुषार्थाच्या मागे जाते हा क्रांतिकारक विचार ही त्यांची भारतवासीयांना मोठी देणगी आहे. आपल्या स्वाथार्साठी जाणीवपूर्वक समाजाला दैववादी बनवणाऱ्या सनातन्यांनी ज्या चावार्काचा इतिहास आणि साहित्य नाहीसं करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, तो आस्तिकशिरोमणी चार्वाक तर शंभर टक्के प्रयत्नवादी, इहवादीच होता. चार्वाक, चाणक्य यांचं अनुसरण केलं असतं, तर भारत कधीच महान झाला असता.

महात्मा जोतीराव फुलेंच्या काळापर्यंत भारतीय समाजाला ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मलेल्या कुटिल, अहंकारी, माणूसघाण्या पोथीवाद्यांनी अज्ञानात ठेवल्याने ते दैववादी झाले असल्यास नवल नाही. इमर्सन म्हणतात, 'उथळ विचाराची माणसं दैवावर विश्वास ठेवतात, शहाणी आणि समर्थ माणसं कार्यकारणभावावर विश्वास ठेवतात.' अज्ञानी भारतीय माणसं ज्ञानाअभावी उथळ विचाराची झालेली होती; ती शहाणीही नव्हती आणि समर्थ तर मुळीच नव्हती. कोई लाख करे चतुराई रे। करमका लेख मिटेना रे भाई ।। असे जर नाटक, सिनेमे, जलसे, तमाशे कानीकपाळी ओरडत असतील, तर समाजाला भाग्यवादातून सोडवणार कोण? विदेशी नाटककार शेक्सपियर 'ज्युलियस सीझर'च्या मुखातून स्वकर्तृत्वाची जाण आणि भान कशी चोखपणे व्यक्त करतो पाहा. सीझर म्हणतो, 'ब्रुटस, जीवनात आपण पराभूत झालो, तर त्याचा दोष नशिबाला न देता स्वतःलाच द्यायला हवा.' किंबहुना पाश्चात्त्य संस्कृतीने नशीब, दैव, नियती, भाग्य हे शब्द शब्दकोशात ठेवले; पण त्यांना व्यवहाराच्या जगात येण्याला मात्र प्रतिबंध केला आहे.

प्रसिद्ध समाजवादी विचारवंत ना. ग. गोरे एकदा म्हणाले, ह्यकृष्णाने प्रतिकार शिकवला, कर्मयोग शिकवला. त्या महात्म्याचा उपदेश पाश्चात्त्यांनी आत्मसात केला आणि येशूने परमावधीची क्षमाशीलता सांगून एका गालावर कुणी थप्पड मारली, तर दुसरा गाल पुढे करायला सांगितलं, ते आपण भारतीयांनी स्वीकारलं.' याच्याही मुळाशी दैववादी पराभूत मनोवृत्तीच आहे. थप्पड खाणं जर नशिबातच असेल, तर आपण काय करणार? हाच पौरुषहीन प्रश्न आपण स्वतःलाच विचारीत असतो. भुकेने जनावर चवताळून उठतं आणि सापडेल त्या प्राण्याची शिकार करून आपलं पोट भरतं. एका विचारवंताने भुकेला माणूसच बंडखोर होतो, असं म्हटलं. पण आपल्या बाबतीत तेही खोटं ठरवून आपण जनावराहून गचाळ वर्तन केलं; करतोय. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी ही आमची घोर निष्क्रियता अनेक शतकांच्या भाग्यवादातून आली आहे आणि आजही चाळीस कोटी माणसं रोज रात्री उपाशीपोटी झोपतात. पण विद्रोह करत नाहीत, करणारही नाहीत, हेच वास्तव दिसून येतं.

न चेतनवतां वृत्तिभयम-अर्थात, ज्यांच्या अंगात काम करण्याची धमक असते, त्यांना आपल्या उदरनिवार्हाची काळजी नसतं. हा विचार भारतीयच आहे. पण तो भाग्यवादाच्या हलकल्लोळात कुठल्या कुठे विरून गेला कोण जाणे! पण आता तो शोधून काढून आपण जपला पाहिजे. अनेक पाश्चिमात्य विद्वान आपला पाठिशी उभे राहून संघर्ष करा आणि जेते व्हा असा संदेश देताहेत. विचारवंत टेरेन्स म्हणतात, दैव नेहमी शूरावर कृपा करते! विचारवंत, ॲडिसनही म्हणतात, 'चांगलं चारित्र्य, चांगल्या सवयी आणि पोलादी उद्योगप्रियता यावर दुर्दैव कधीच हल्ला करू शकत नाही.' मग अशा पराक्रमी व्यक्ती सुखासमाधानाचं जीवन आपला अधिकार म्हणून का जगू शकणार नाहीत?

पण यासाठी माणसाने कर्तव्यात सुखोपभोग शोधले पाहिजेत. म्हणजे दैवाच्या नावाने त्याला रडावं लागत नाही. म्हणून लक्षात घ्या-

दैव, भाग्य हे । हिणकस शब्द
आळसाला थारा । नका देऊ ॥१
कर्तव्यात सदा । निमग्न जो होई
त्याच्या घरा येई । सुख सारे ॥२
क्षणाची उसंत । घेईना तो शूर
आणी महापूर । समृद्धीला ॥ ३
मूर्ख विचारतो । भाग्य ज्योतिष्याला
त्याच्या दुर्दैवाला । अंत नाही ॥४
अडाणी ज्योतिषा । भाग्य कळे जर
वाहावा का भार । पदव्यांचा ? ॥५
राशीफल सांगे । डाकू म्हणा त्यास
कापतो खिशास । राजरोस ॥६
रोज नवी उंची। गाठा कर्तृत्वाची
त्यापुढे भाग्याची । बात खोटी ॥७
शिल्पकार तुम्ही । अपुल्या भाग्याचे
उणे ते कशाचे । सांगा आम्हा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# 'एकटेपणा' आव्हान का? शक्तिशाली संधी...

आज कलयुगामध्ये जिथे जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, त्याच ठिकाणी मानवी मानसिकता एकटेपणाकडे गेली आहे का? असा प्रश्न सर्वांनाच उद्भवत आहे. अशातच ही "एकटेपणा" ज्याला संधी असू शकते हे कळून चुकले आहे, तोच या शक्तीचा वापर यशाकडे नेण्यासाठी करू शकतो. आज आपण आजूबाजूला अनेक लोकांशी संबंधित आहोत, बोलत आहोत आणि सहवासात आहेत, तरीसुद्धा काही लोकांना एकटेपणा जाणवतो. जास्त करून ही मानसिकता झाली आहे की, आपण या जगात एकटे पडलो आहोत, पण याच एकटेपणाला काहीजण आव्हाने समजतात तर काही लोक त्याचा एक शक्तिशाली संधी म्हणून वापर करत आहेत, आणि हीच शक्तिशाली संधी यश मिळवून देऊ शकते, हे खूप कमी लोकांना कळते. आज आपण कुटुंब, मित्र-मैत्रिणी, समाज तसेच विविध लोकांच्या संस्कृतीशी जुडले गेलेलो आहोत. पण तरीपण का आज आपल्याला एकटेपणा जाणवतोय हा प्रश्न प्रत्येक जण कधी कधी स्वतःला विचारत असतो. खरं पाहिलं तर हे एक आवाहन आहे असे लोकांना वाटते कारण मानव हा सामाजिक व्यक्ती आहे असं संबोधलं जातं. त्याला समाज आणि दुसऱ्या मानवाची गरज आहे असे समजले जाते. परंतु आज या गोष्टीला तडा जाताना दिसत आहे. आजकालच्या काळामध्ये आपला आपला आहे का? हाही एक प्रश्न उद्भवत राहतो. आपण ज्याच्यावर विश्वास ठेवतो, आपण ज्याच्यावर प्रेम करतो, मैत्री नाते जोडतो, तो आपला व्यक्ती आहे का?याची शाश्वती आज नाही राहिली. त्यामुळे एकटेपणा लोकांना जाणवत आहे. कधी कधी तर गर्दीमध्ये सुद्धा लोकांना एकटेपणा जाणवतो. अशामुळे मानसिक आजार आणि मानसिक त्रास उद्भवत आहे. अनेक मनोपचार डॉक्टरांच्या मते हा एक मूळ प्रश्न आहे. काही लोकांच्या अनुभवानुसार एकटेपणा हा कधी कधी त्रासदायक असू शकतो, यामुळे काहीदा टोकाची भूमिका घेतली जाते. जेव्हा तुम्ही सर्वांच्या मध्ये असताना सुद्धा समाधानकारक असाल आणि स्वतःच्या आत मध्ये अंतरंगामध्ये जर वाकून पाहिले, तर तुम्हाला एकटेपणा जाणवणार नाही आणि तो जाणवला तरी त्याची ताकद करता येते. हा एकटेपणा शक्तिशाली आहे, हे खूप कमी लोकांना जाणवते आणि याचा सदुपयोग केला तर यशाकडे जायचा मार्ग सोपा होतो, हे खूप कमी लोकांना माहिती आहे. आज आपण लोकांमध्ये फिरत असतो, पण अशातच एकटेपणाची ताकद आणि त्याचे गुढ जर कळले तर नक्कीच तो व्यक्ती समाधानी आणि ताकदवान मानला जातो. अनेक लोकांनी जसे के नेता, अभिनेता, कलाकार, उद्योजक क्रीडापटू हे स्वतःसाठी वेळ काढतात आणि त्यामुळेच ते स्वतःहून स्वतःपेक्षा जास्त करण्याचे प्रयत्न करतात आणि हा प्रयत्न त्यांना यशस्वी बनवतो. स्वतःसाठी दिलेला वेळ हा शक्तिशाली बनवतो. अनेक लोकांना आव्हाने येतात, त्यात आज-काल लोक मदत करतील या अपेक्षेने जोडलं गेलं असो तर हे स्वार्थ म्हणावं लागेल ना? यापेक्षा समाधानी राहून एकटेपणाला शक्तिशाली बनवून त्यातून सुखद मार्ग काढला तर जगणे आनंदी होईल काही लोकांमध्ये एकटेपणा हा त्रासदायक होत आहे, तर दुसरीकडे काही जण त्याचा संधी म्हणून वापर करत आहेत. तुम्हाला आनंदी व्हायचं असेल तर समाधानी वृत्तीने एकटे फिरणे, वाचन करणे, कला जोपासणे, एखादा सिनेमा पाहणे, आवडीचा खाद्यपदार्थ खाणे किंवा आपल्यालाजी गोष्टी आवडतात त्यात आनंद घेणे हे एकट्याने केले तरी चालते. आता हे एकटेपणा टॅबू राहिला नाही. समाज काय म्हणतो याच्यापेक्षा स्वतःच्या नजरेत आपण स्वतः कसे आहोत हे पाहणे सर्वात महत्त्वाचे आहे. एकटेपणाला टाबू न बनवता त्याची पूर्ण ताकद वापरून या जगावर राज्य केलेले लोक आहेत. अनेक असे लोक आहेत जे की स्वतः स्वतःशी लढत असतात आणि एकटेपणाला मात करत संधीचे सोने करतात आणि यश गाठतात, हेच सत्य आहे म्हणूनच म्हणतो "एकटेपणा" 'मेक इट एज ए पावर, अँड बी पॉवरफुल'



**ऋत्विज चव्हाण**
मो 8380800083/
9527377555

वात्रटिका

## नवी प्रगती

वर्षानुवर्षे लोटली आणि
बंधू आले एकमेकांजवळ...
कोणाची चुळबुळ झाली
तर कोणाची वळवळ...
फोडाफोडी आणि तोडा
ही जुनीच राजनिती आहे...
दुसरी कशातच नसो पण
यात आमची प्रगती आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

पान १ वरून

# जिल्हाधिकारी व सिईओ...

हा कार्यक्रम यशस्वी करणे साठी कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन सोनकंबळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, अधिक्षक अविनाश गोडसे, झेड ए शेख, अधिक्षक शहानवाज तांबोळी, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, क्षमता बांधणी समन्वयक शंकर बंडगर, सनियंत्रण सल्लागार यशवंती धत्तुरे, वित्त व संपादणूक सल्लागार अर्चना कणकी, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, सांडपाणी सल्लागार प्रशांत दबडे, अल्फीया बिराजदार, सुजाता साबळे, तेजस्विनी साबळे, आनंद मोची, रत्नदीप फडतरे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन ऐश्वर्या हिब्बारे यांनी केले तर प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी आभार मानले.

# यंदाच्या आषाढी वारीने...

यालाही एआय तंत्रज्ञानाची मदत उपयोगी पडल्याने योग्य नियोजन झाल्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

**180 चोरांना पोलिसांच्या माऊली पथकाने घेतलं ताब्यात**

आषाढी एकादशीला एकेरी वाहतूक केल्याने मंदिर परिसर प्रदक्षिणामार्ग आणि वाळवंट यापैकी कोठेही चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या नाहीत. संपूर्ण यात्रा कालावधीत कोणतीही दुर्घटना झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. एकादशी दिवशी जवळपास 2700 चुकलेल्या भाविकांना पुन्हा त्यांच्या जवळच्या माणसांमध्ये सोडण्यात आले. गदीर्चा फायदा घेऊन चोऱ्या करणाऱ्या जवळपास 180 चोरांना पोलिसांच्या माऊली पथकाने ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

# फडणवीस यांच्या स्वागताला...

चर्चांना उधाण आलं आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती दिलीप माने यांची निवड

नुकतंच सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोठा ट्विस्ट बघायला मिळाला होता. बाजार समितीच्या निवडणुकीसाठी भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली भाजप-काँग्रेस नेत्यांचे एकत्रित पॅनल करण्यात आला होता. काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, काँग्रेस कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, काँग्रेस नेते बाळासाहेब शेळके यांचा भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला पाठिंबा असल्याचं जाहीर करण्यात आलं होतं. यात भाजपला फुल्ल सपोर्ट देत सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी काँग्रेस नेते दिलीप माने यांची निवड झाली होती.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सुर्यवंशी मृत्यूप्रकरणी फडणवीस, बोर्डीकर यांनी आंबेडकरी समाजाची माफी मागावी - उत्तरेश्वर कांबळे





**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** परभणी येथे 10 डिसेंबर 2024 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकलगत असलेल्या संविधान शिल्पाची मोडतोड करून विडंबना करण्यात आली होती. या संविधान शिल्पाची मोडतोड केल्या प्रकरणात भीम आर्मी संविधान रक्षक दलाचे मराठवाडा अध्यक्ष भिमपुत्र कचरुदादा गोडबोले यांनी फिर्याद दाखल केली होती. ते स्वत आपल्या कार्यकर्त्यासह या प्रकरणात जातीनिशी लक्ष ठेवून होते. अनेक जखमी भीमसैनिकांना हॉस्पीटल व घरी जाऊन आधार देत होते. या संतापजनक घटनेचा निषेध म्हणून परभणीतील विविध आंबेडकरी संघटनांनी व पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बंदची हाक दिली होती त्यात पोलीसांनी बंदला हिंसक वळण दिले आणि कोंम्बिंग ऑपरेशन करून आंबेडकरी समाजातील तरुणांची व महिलांची धरपकड केली अनेकांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले. भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना पोलीसांनी कोठडीत अमानुषपणे मारहाण केल्याने त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अनेक तरूणांना, महिलांना पोलीसांनी जायबंदी केले.

दरम्यान या घटनेचे पडसाद राज्यात उमटले विधीमंडळात हा विषय मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेऊन भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना श्वसनाचा त्रास होता म्हणून त्यांचा मृत्यू झाला असे खोटे बोलून आरोपी पोलीसांना क्लिनचीट दिली आणि मेघना बोर्डीकर यांनी शवविच्छेदनाचा अहवाल येण्या आधीच सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू हा ह्रदयविकाराच्या झटक्याने झाला आहे, असे प्रसार माध्यमातून सांगितले श्रध्देय बाळासाहेब आंबेडकर यांनी या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती कालच औरंगाबाद खंडपीठाने सोमनाथ सुर्यवंशी मृत्यू प्रकरणात पोलीसांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले असून आता या प्रकरणात सखोल माहिती न घेता चुकीची व खोटी विधाने करणारे आणि दंगेखोर, आरोपी पोलीसांना पाठीशी घालणारे देवेंद्र फडणवीस व मेघना बोर्डीकर यांनी समस्त आंबेडकरी समाजाची माफी मागावी अशी मागणी भीम आर्मी संविधान रक्षक दलाचे प्रदेशाध्यक्ष उत्तरेश्वर कांबळे यांनी प्रसार माध्यमातून केली आहे.

# जुळे सोलापुरातील सैफुल ते बॉम्बे पार्क दरम्यानचा रस्ता होतोय खड्डे मुक्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुळे सोलापूरातील सैफुल ते बॉम्बे पार्क जाणारा रोड जवळपास पाच वर्षांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते तद्नंतर सदर रस्त्यावर ड्रेनेजचे काम, नळ कनेक्शन, व पावसामुळे जागोजागी मोठमोठे खड्डे पडले होते त्यामुळे शाळेला जाणारे विद्यार्थी, महिलावर्ग, वाहनधारक, ज्येष्ठ नागरिक यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. वेळोवेळी त्या भागातील नागरिकांनी सोलापूर महानगरपालिका व झोन कार्यालय येथे तक्रारी केलेल्या होत्या परंतु त्यांची कोणीच दखल घेत नव्हते शेवटी संबंधित नगरातील अनेक नागरिक यांनी नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांना ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर तातडीने सोलापूर महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे व नगर अभियंता कार्यालय यांना सदर समस्या बाबत लेखी निवेदन दिल्यानंतर तातडीने सैफुल ते बॉम्बे पार्क जाणाऱ्या रोडवर डांबरी रिमिक्स टाकून त्यावर रोलर फिरवून रस्ता व्यवस्थित करून दिला आहे. त्यामुळे सदर नगरातील नागरिकांनी सुटकेचा निस्वास सोडला असून तातडीने सदर समस्या सोडवल्याबद्दल नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांचे मनापासून आभार व्यक्त करत असून आपले मनोगत व्यक्त करत आहेत की..



सध्या नगरसेवकांचा कार्यकाल संपलेला असून प्रशासन राजवट सुरू आहे त्यामुळे कुठलेही नगरसेवक सक्रिय होताना दिसत नाही परंतु नगरसेविका सो राजश्री चव्हाण ह्या सातत्याने नागरिकांच्या समस्या मनावर घेऊन पाठपुरावा करून सोडवतात हे विशेष. अशा नागरिकांच्या समस्यासाठी धावून येणाऱ्या नगरसेविका सौ राजश्री चव्हाण व त्यांचे पती भाजपचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण हे धावून येतात व समस्या सोडवतात त्यामुळे जुळे सोलापुरातील सर्वसामान्य नागरिक त्यांच्या कायाचे कौतुक करत आहेतअशा प्रतिक्रिया देत आहेत.

नगरसेवक असावा तर मा.नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांच्यासारखा असावा असे प्रत्येक नगरातून नागरिकाचे मनोगत येत आहेत.

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने हद्दवाढ भागात दिंडीचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हद्दवाढ भागातील स्वागत नगर येथे संभाजी ब्रिगेड च्या वतीने संभाजी ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनलताई दास यांच्या नेतृत्वाखाली हद्दवाढ भागातील परिसरामध्ये देवशाहीनी आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या दिंडीमध्ये आजूबाजूच्या परिसरातील बहुसंख्य महिला भक्तिभावाने विठूरामाच्या गजर करत सामील झाले होते देहू ते पंढरपूर वारी सुरू करण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांचे मोठे योगदान होते त्यांनी दिंडीला संरक्षणाबरोबर आर्थिक मदत ही केली होती त्यामुळे या दिंडीत विठ्ठल रुक्मिणी बरोबर छत्रपती संभाजी महाराजांची मूर्ती चा समावेश करण्यात आला होता.

या दिंडी सोहळया संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले संभाजी ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनलताई दास शहराध्यक्ष शिरीष जगदाळे शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे जिल्हा सचिव सिद्धाराम स्वळे जिल्हा सचिव बबन डिंगणे रवीकिरण दास राज स्वामी

शितल सलबत्ते प्रियंका राऊत राधा घुले संजीवनी सलबत्ते विजया काशीकर ताराबाई कोकाटे मैनाबाई साळुंखे माधुरी राऊत नीलम पाटील सुनिता कारंडे शकुंतला पवार शोभा देसाई राजश्री गद्रे ज्योती मोरे प्रज्ञा कोळी सविता तेल्लूर सुनिता साळुंखे गीता कलागते ज्योती घुलेद आधी सह बहुसंख्य महिला उपस्थित होत्या

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# टेंभुर्णीत बबनदादावरील शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी महामृत्युंजय महाअभिषेक



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** संयोजक विजयदादा खटके व खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बंडूनाना ढवळे यांचे वतीने परतीच्या मार्गावर असलेल्या वारकऱ्यांना खिचडीचे मोफत वाटप करण्यात आले.सुमारे 50 हजार वारकऱ्यांनी याचा लाभ घेतला. पंढरपूरच्या मार्गावर असणाऱ्या सर्व विठ्ठलभक्त वारकऱ्यांसाठी ही सोय करण्यात आली होती. मागील 5 वर्षांपासून प्रतिष्ठान हा उपक्रम राबवित आहे पंढरपूरकडे जात असताना बऱ्याच ठिकाणी वारकऱ्यांची सोय होते परंतु परतीच्या मार्गावर ही विठ्ठल भक्तांची फराळाची सोय होणे गरजेचे आहे.या उद्देशाने हा विधायक व रचनात्मक उपक्रम चालू केलेला आहे.यामध्ये दोन टन साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले.

यावेळी माढा तालुक्याचे भाग्यविधाते माजी आमदार बबनरावजी शिंदे हे हृदय शस्त्रक्रियेसाठी अमेरिका येथे गेले आहेत त्यांची शस्त्रक्रिया यशस्वी व्हावी व त्यांना उत्तम आरोग्य मिळावे यासाठी महामृत्युंजय महाभिषेकाचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील 5 दाम्पत्यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीची पुजा करुन महाभिषेक केला. यावेळी माढा तालुक्यातील आदरणीय दादांवर प्रेम करणारे नेतेमंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मोबाईल वरून व्हिडिओ कॉलद्वारे आदरणीय बबनदादांनी ही सर्वांशी संवाद साधला.यावेळी सर्व कार्यकर्ते भावनिक झाले होते. दादांनी महाअभिषेका साठी बसलेल्या दांपत्यांचे आभार मानले व सर्वांना आषाढीच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बंडूनाना ढवळे यांनी केले.

यावेळी दिलीपराव भोसले, शिवाजीराव पाटील-चांदजकर, शंभुराजे मोरे, सचिन होदाडे, गणेश काशीद, गोरख देशमुख व उपाध्यक्ष वामनभाऊ उबाळे यांनी मनोगतातून बबनदादांच्या उत्तम आरोग्याची कामना व्यक्त करीत पांडुरंगाकडे साकडे घातले.

यावेळी विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन वामनभाऊ उबाळे,माढा तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष बंडूनाना ढवळे, जिल्हा दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे, शिव विचार प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयदादा खटके, जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव पाटील, माढेश्वरी अर्बन बँकेचे व्हा.चेअरमन अशोकशेठ लुणावत, संचालक गणेश काशीद, डॉ.गोरख देशमुख,मार्केट कमिटीचे उपसभापती सुहास पाटील, आप्पासाहेब उबाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मुळे, आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड, सज्जनराव जाधव, सरपंच तानाजी लांडगे, प्रदिप चौगुले, कैलास तोडकरी, विठ्ठल मुकणे, कारखान्याचे संचालक निलकंठ पाटील, संदीप पाटील, रमेश येवले पाटील, वेताळ जाधव, विष्णू हुंबे, लक्ष्मण खुपसे, रमाकांत कुलकर्णी, अशोक मिस्कीन, श्रीकांत कोरे, दत्तात्रय देवकर, तांबवेचे तंटामुक्ती अध्यक्ष नागाभाऊ खटके,मार्केट कमिटीचे संचालक दिलीपराव भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे माढा विधानसभा अध्यक्ष रमेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष नागेश खटके, रामभाऊ शिंदे, सर्जेराव बागल, श्रीकांत लोंढे, लक्ष्मण शिंदे, मार्केट कमिटी संचालक शिवाजीराव पाटील, दादासाहेब देशमुख, चव्हाणवाडी चे माजी सरपंच नवनाथ शिंदे, अर्जुन सलगर, चव्हाणवाडी विकास सोसायटीचे माजी चेअरमन नरहरी नांगरे, संजय मिस्किन, टाकळी चे सरपंच तानाजी सलगर, शिवशंकर हॉटेलचे मालक बाळासाहेब चव्हाण, सौदागर नांगरे, सचिन तळेकर, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य सचिन होदाडे, विनायक चौगुले, अमोल देवकर मार्केट कमिटीचे सदस्य रामभाऊ वाघमारे, धनंजय मोरे तसेच आवर्जून टेंभुर्णी शहरातील पत्रकार, ज्येष्ठ पत्रकार सदाशिव पवार, सोपान ढगे,सतीश चांदगुडे, गणेश पोळ, संतोष वाघमारे, पिंटू सुरवसे, यांच्यासह तालुक्यातील विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य माढेश्वरी बँकेचे संचालक, मार्केट कमिटीचे संचालक,सोसायटीचे चेअरमन व संचालक यांच्यासह ग्रामस्थ व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेवटी या कार्यक्रमाचे आभार नागेश खटके यांनी मानले तर सूत्रसंचालन सचिन पवार यांनी केले.

# पु.ना. गाडगीळ अँड सन्सतर्फे पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घ्यावे. चांगला अभ्यास करून यश मिळवावे. आई- वडील आणि देशाचे नाव लौकिक करावे असे आवाहन करताना श्रमिक पत्रकार संघाने पत्रकारांसाठी राबविलेल्या विविध उपक्रमासाठी नेहमीच सहकार्य राहील,अशी ग्वाही पु.ना. गाडगीळ अँड सन्सचे सोलापूर शाखा व्यवस्थापक कुलदीपसिंह राजपूत यांनी दिली.

पु.ना. गाडगीळ अँड सन्सच्या वतीने पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप समारंभ सोलापूर श्रमिक पत्रकार संघ सभागृहात सोमवारी दुपारी पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी



विचारमंचावर पु.ना. गाडगीळ अँड सन्सचे व्यवस्थापक हेमंतकुमार साई, सुपरवायझर अन्वीर किणगी, तेजस शहा, प्रशांत देशमुख, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

व्यवस्थापक हेमंतकुमार साई म्हणाले, पु.ना. गाडगीळ अँड सन्सच्या वतीने विविध उपक्रमांना सहकार्य केले जाते.पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे.पत्रकार नेहमीच समाजाचे विविध प्रश्न आणि समस्या मांडण्यासाठी धडपडत असतो. श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने विविध स्तुत्य उपक्रम राबविले जातात. पत्रकारांच्या विविध उपक्रमासाठी आमचे नेहमीच सहकार्य राहील, असे आश्वासन दिले.

श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन खजिनदार किरण बनसोडे यांनी केले तर सरचिटणीस सागर सुरवसे यांनी आभार मानले. यावेळी विविध माध्यमांचे पत्रकार आणि पाल्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ

प्रतिक टॉवर, पहिला मजला, गायकवाड बिल्डींग, जुन्या स्टेट बँकेजवळ, मेनरोड, मोहोळ

दुरध्वनी क्रमांक ०२१८९- २३२३६९ ई-मेल आयडी.- arcsmohol@gmail.com

### जाहिर प्रसिध्दीकरण

दिनांक :-०७/०७/२०२५

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ अनुसार तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ यांच्या वैधानिक कार्यक्षेत्रातील व प्रवर्गातील खालील क-वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक कार्यक्रमांची घोषणा मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,म.रा.पुणे यांनी केलेली आहे. सदर निवडणूक कार्यक्रमातील विविध टप्पे खालीलप्रमाणे आहेत.


| अ.क्र. | संस्थेचे नांव | निवडणुक निर्णय अधिका-याचे नांव | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करावयाचा दिनांक | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | नामनिर्देशन पत्र माघारी घेण्याचा कालावधी | मतदान व मतमोजनीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री शिवगंगा महिला को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या. बेगमपूर ता. मोहोळ | एस.टी.तेलंगरे, सहाय्यक निबंधक | ०८/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ वेळ स. ११.०० ते ३.०० | १५/०७/२०२५ वेळ सकाळी ११.३० | १५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ स.११.०० ते ३.०० | ०९/०७/२०२५ |
| ०२ | जनसंजीवनी अर्बन महिला को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मोहोळ | एस.टी.तेलंगरे, सहाय्यक निबंधक | ०८/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ वेळ स. ११.०० ते ३.०० | १५/०७/२०२५ वेळ दुपारी ०३.३० | १५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ स.११.०० ते ३.०० | १०/०७/२०२५ |
| ०३ | त्रिशालादी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बेगमपूर ता. मोहोळ | सी.ए. निलकंठ, प्रमाणित लेखापरीक्षक मोहोळ | ०८/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ वेळ स. ११.०० ते ३.०० | १५/०७/२०२५ वेळ सकाळी ११.३० | १५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ स.११.०० ते ३.०० | ०९/०८/२०२५ |
| ०४ | घोडेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या बेगमपूर, ता.मोहोळ | एस.टी. शिंदे, मुख्य लिपिक | ०८/०७/२०२५ ते १४/०७/२०२५ वेळ स. ११.०० ते ३.०० | १५/०७/२०२५ वेळ दुपारी ०३.३० | १५/०७/२०२५ ते २९/०७/२०२५ स.११.०० ते ३.०० | १०/०८/२०२५ |

टीप : १. उपरोक्त सर्व सहकारी संस्थांचे मतदारसंघ, समितीची रचना, निवडणूकांच्या विविध टप्पयांच्या तारखा व वेळा इ.बाबतचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संबंधित तालुक्याचे तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांचे कार्यालय,संबंधीत सहकारी संस्थेच्या नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.

२. वरीलपैकी सर्व संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय हे संबंधीत तालुक्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय राहील. मतदान व मतमोजणीचे ठिकाण आवश्यकते नुसार संबंधीत संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कडून जाहिर करण्यात येईल.

**सही/-**
**(एस.टी.तेलंगरे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहोळ**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) सुवासिक लाकूड देणारे झाड २) हा चिरताना डोळ्यातून पाणी येते ३) फोटो (हिंदीत) ४) निंदा, **टिपण्णी ५) त्वरेने, लगेच ६) अंतराळ, थोडा अवधी असणे ७) युध्दानंतरची समेटाची बोलणी १०) पिकांचा हिवाळ्यातील हंगाम १३) उत्कर्ष, विकसित होणे १६) फॅक्टरी (मराठीत) १८) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात २०) दहा (हिंदीत) २१) शालेय गाईड पुस्तकांचे प्रकाशन संस्था २२) भारतीय कसोटी टीममधील एक फलंदाज २३) स्वर्गच्या विरूध्दार्थी २६) झेंडा, मंगलसमयी सुशोभित करण्यासाठी या रांगेने लावतात २७) श्रीगणेशाचे वाहन २९) शर्थ ३१) एक भाजी ३२) इंदिरा गांधी यांच्या आईचे नाव ३३) देवतांचे पेय ३४) पात्र, गुणवान ३६) कागदी दस्त्यांचे माप ३७) साईबाबांचा संदेश-*** मालिक एक ३८) मिरवणुकीप्रसंगी हा उधळतात ३९) एक पांढऱ्या रंगाचा पक्षी ४१) पाणी साठवण केलेला मोठा बंधारा ४४) टभ उलट लिहा ४६) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक **

**आडवे शब्द :** १) महाराष्ट्र भाजपचे एक नेते ६) राज ठाकरे यांच्या मुलाचे नाव ८) नोकर, गुलाम ९) कावळ्याचे ओरडणे १०) मावळ्यांची घोषणा- ** हर महादेव १२) आकाश १४) पाच गुणिले चार १५) चुलत्यांना या नावाने संबोधतात १७) ताणला जाणारा लवचिक पदार्थ १८) पलीकडे, पल्याड १९) राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष (फक्त नाव) २१) भन (उलट लिहा) २२) तपासणे, धनादेश (इंग्रजीत) २४) विशेष, स्पेशल २५) श्रीविष्णूचा एक अवतार, डुक्कर २६) लायसन (मराठीत) २८) व्यवस्थित, **नेटके २९) घोडा ३०) दह्यात पाणी मिसळून हे बनवितात ३१) लग्न (हिंदीत) ३२) कापण्याचे साधन (इंग्रजीत) ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा जिल्हा ३५) गोलाकार तळून केलेला खाद्यपदार्थ ३७) वेळ (हिंदीत) ३८) सोनाली कुलकर्णी अभिनीत एक चित्रपट, एक गोड खाद्यपदार्थ ४०) प्रगती, उन्नती ४१) उन्हाळ्यातील एक महिना ४२) एक म्हण-बैल गेला झोपा ** ४३) रवा, शिरा ४४) उजाड माळरान ४५) समुद्राच्या पाण्याची लहर ४७) नदीकाठची लवचिक वनस्पती ४८) पोट (हिंदीत) ४९) श्रावण (हिंदीत)

## सुडोकु - 295

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

